# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३**

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ११

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: डब्ल्यू-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**रूपये:- १,०२,०४,००,५७,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (१) | ५०४६ | १० | सातपुडा विकास मंडळ, पाल, जि.जळगाव ही संस्था आदिवासींच्या विकासासाठी १९५३ साली स्थापन करण्यात येणे, शिक्षण, कृषी, सहकार, समाज प्रबोधन अशा विविध क्षेत्रात ही संस्था सातपुडा पर्वतातील आदिवासीलोकांसाठी कार्यरत असणे, संस्था प्राथमिक, माध्यमिक आश्रम शाळा, ज्युनिअर कॉलेज, किमान कौशल्य विभाग, कृषी विज्ञान केंद्र, कृषी तंत्र निकेतन व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठाचे अभ्यासकेंद्र चालवित असणे, त्यामुळे आदिवासी मुले व मुलींना बारावी पर्यंतचे शिक्षणघेता येत असून त्यानंतर उच्च शिक्षणाची सुविधा जवळपास नसल्याने व ये-जा करुन किंवा बाहेरगावीराहून शिक्षण घेणे परवडत नसल्याने त्यांचे शिक्षण बारावीनंतर घेता न येणे,या ३०-३५ कि.मी.पर्वतीय क्षेत्राची उच्च शिक्षणाची गरज लक्षात घेऊन सातपुडा विकास मंडळाने पाल येथे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरु केले असणे, त्यामहाविद्यालयाला कायमस्वरुपी विना अनुदान तत्त्वावर परवानगी मिळाली असून हे महाविद्यालय आदिवासी उपयोजना क्षेत्र अंतर्गत असून सहशिक्षण महाविद्यालय असणे, सदर महाविद्यालय कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावशी संलग्न असून या महाविद्यालयाच्या परिसरात सुमारे २५ लहान खेडी वसलेली असून महाविद्यालयाचीएकुण विद्यार्थी संख्या १७४ असून त्यापैकी १०६ विद्यार्थी अनुसुचित जमातीचे असणे, या आदिवासी विद्यार्थ्यांना सर्व सुविधायुक्त व दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी या महाविद्यालयाला शासनाने अनुदान उपलब्ध करुन देणे आवश्यक झालेअसणें, शिक्षणासोबतच खेळ, इतर अभ्यासक्रम पूरक व अभ्यासक्रमेतर उपक्रम, स्पर्धापरिक्षा मार्गदर्शन केंद्र ही उपलब्ध करुन देता येणे शक्य असणे, त्यामुळे आदिवासी विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांशीस्पर्धा करुन विविध क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी करण्यासाठीआदिवासी समाजाचे जीवनमान व राहणीमान ऊंचाविण्यासाठी या आदिवासी भागाचीगरज लक्षात घेऊन या महाविद्यालयाला प्राधान्य क्रमाने अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (२) | ५०९१ | १० | पुरंदर, जि.पुणे या क्षेत्रातील ऐतिहासिक व धार्मिक परंपरा असलेला तालुका भौगोलिक दृष्टया सहयाद्रीच्या उंच पर्वत रांगावर वसलेला असुनही या ठिकाणी कमी पाण्यावरील सिताफळ, अंजीर, डाळींब त्याचप्राणे वाटाणा व इतर तरकारी पिकांचे मोठया प्रमाणावर उत्पादन घेण्याबरोबरच शेतकरी शेती पुरक व्यवसायाकडे वळलेला असून त्या माध्यमातून पशु व कुक्कुट पालन व्यवसायही दिवसेंदिवस वाढत आहे. मिल्क ॲन्ड ॲग्रो सारख्या संस्थेमुळे दुग्ध व्यवसायात मोठया प्रमाणात नफा मिळत असल्याने तरूणांचा दुग्धव्यवसायाकडे कल वाढलेला आहे. त्याचबरोबर इग्लू कोल्ड स्टोअरेज मुळेशेतकऱ्यांना आपल्या मालाला चांगला बाजार भाव येईपर्यत साठविता येतो. त्यामुळेपरीसरात तरूणांनी एकत्र येवून शासनाच्या विविध योजनांचा फायदा घेवून फळप्रक्रीया उद्योग सुरू केलेले आहेत. तालुक्यातील या परीस्थितीचा विचार व अभ्यास करून तरूणांना नोकरीच्या मागे न लागता व्यावसायिक शिक्षण देण्यावर भर दिला असून त्या करीता अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय सुरू करण्याबाबत करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. राजेश टोपे** |
| (३) | ५०९९ | १० | शासनाने दि. २४ नोव्हेंबर, २००१ नंतर राज्यातील नविन महाविद्यालयाच्या बाबतीत कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारलेले असणे, त्याअनुषंगाने सदर धोरण दि. २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वीच्या वरिष्ठ महाविद्यालयांना लागू होत नसल्यामुळे ७८ वरिष्ठ महाविद्यालयांना सरसकट १०० टक्के अनुदान मंजूर करण्याबाबत मागील २२ वर्षापासून अविरतपणे शासनास निवेदने देवूनही प्रश्न प्रलंबित असणे, अनुदानाच्या धोरणानुसार किती महाविद्यालयांनी अनुदानाचे निकष पूर्ण करण्यात आले, याबाबतची पडताळणी झालेली असून आर्थिक भारासह अद्यावत परिपूर्ण प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी मागील १५ महिन्यापासून आजपर्यंत अनुदान मिळणेबाबत प्रलंबित असणे, वरिष्ठ महाविद्यालयांना सर्व त्रुटी व निकषाची पूर्तता करुन व अनुदानास पात्र असून देखील अद्यापपर्यंत अनुदान देणेकामी टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास येणे, सर्व ७८ वरिष्ठ महाविद्यालयांपैकी ग्रामीण व दुर्गम भागातील असल्याने अनुदान न मिळाल्याने वेतनाअभावी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व पर्यायाने त्यांच्यावर अवलंबून असलेल्या त्यांच्या संपूर्ण कुटुंबियीय यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उद्भवणे, 78 महाविद्यालयातील कर्मचारी अनुदानाच्या न्याय्य मागणीसाठी 6 फेब्रुवारी 2023 पासून आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत धरणे आंदोलनासाठी बसलेले आहेत. परिणामी त्यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, त्याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (४) | ५११९ | १० | ”शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधात नसलेली पदे बहाल करून कर्मचाऱ्यांचे वेतन वाढविण्याचा राज्यातील विद्यापीठांचा प्रकार उघड केला असणे, या घोटाळ्यातून 1662 कर्मचाऱ्यांनी तब्बल 210 कोटी रुपयांचा चुराडा करणे, यामध्ये सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, अमरावती, जळगाव, तसेच |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | औरंगाबाद विद्यापीठांचा समावेश असणे, एक हजारहून अधिक कर्मचाऱ्यांचे पदनाम बदलून वेतनश्रेणी वाढविण्यात आल्यामुळे याची सखोल चौकशी करून दोषी असणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना." |
| (५) | ५१२२ | १० | "पुस्तकांच्या किंमती एकीकडे भरमसाठ वाढत असताना ग्रंथालयांच्या भाड्याच्या खर्चात, विजबिलात, कर्मचाऱ्यांचे पगार आणि व्यवस्थापनाचा खर्च यामध्ये वाढ होत असताना राज्यातील ग्रंथालयांना शासनाने 60% वाढीव अनुदान मंजूर केलेले असणे, तथापि सदर वाढीव अनुदान अद्याप ग्रंथालयांना देण्यात आलेले नसल्यामुळे ग्रंथालयांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झालेला असणे, परिणामी राज्यातील पुस्तक वाचक चळवळ बंद होण्याच्या मार्गावर आलेल्या असल्यामुळे महाराष्ट्रासारखे सांस्कृतिक राज्य वाचन संस्कृती आणि मराठी भाषेच्या संवर्धनासाठी काम करणाऱ्या ग्रंथालयांची होत असलेली उपेक्षा याकडे शासनाचे दुर्लक्ष व शासनाने करावयाची उपाययोजना." |
| (६) | ५१२४ | १० | "मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉक्टर सुहास पेडणेकर यांचा कार्यकाळ संपून सहा महिन्यांचा कालावधी उलटला तरी देखील नवीन कुलगुरू निवडीसाठी शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, परिणामी त्यांच्यासोबतच तात्कालीन कुलगुरूंची कार्यमर्यादा देखील संपलेली असणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिनियमातील कलम एक नुसार कुलगुरू निवड शोध समितीमध्ये शिक्षण तज्ञांची नेमणूक आवश्यक असणे, या समितीत उच्च शिक्षण पदावर सचिव पदावर असणाऱ्या आयएएस अधिकाऱ्यांची सदस्य म्हणून नेमणूक करण्याची गरज नसताना केलेली नेमणूक, तसेच शोध समितीचा उद्देश कुलगुरू पदासाठी उत्कृष्ट व्यक्तीचा शोध घेऊन त्याची एकमताने निवड करणे असे असताना इच्छुकांकडून अर्ज वाढविण्याचे उद्योग केले जात असणे, परिणामी राज्यातील शैक्षणिक वर्तुळामध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना." |
| | | | **श्री. दिलीप वळसे-पाटील** |
| (७) | ५०५६ | १० | "महाराष्ट्र सीओईपी एकल तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या WBP-2004/(341/04) (1)/TE-6 दिनांक 31 मार्च, 2004 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 2.3 च्या 3 नुसार शासनाने मान्य केलेल्या सन 2003 सालातील शासन मान्य पदांच्या आकृतीबंधानुसार शासनामार्फत शासनास ठोक वेतन अनुदान (Block Grant) देणे बंधनकारक असतानाही अद्यापपर्यंत ठोक वेतन अनुदान (Block Grant) न दिल्यामुळे विद्यापीठ आर्थिक अडचणीत येणे, शासनाने ठोक वेतन अनुदान न दिल्यास प्रतीविद्यार्थी अंदाजे रुपये 4 लाख वार्षिक फी आकारण्याबाबत निर्माण झालेली परिस्थिती, यामुळे विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील अधिकारी व कर्मचा-यांमध्ये पसरलेला असंतोष, विद्यापीठाच्या आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम, पर्यायाने विद्यापीठामधील संशोधनावर झालेला विपरित परिणाम, म्हणून शासनाने तातडीने निधी उपलब्ध |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करुन देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" |
| | | | **मागणी क्रमांक: डब्ल्यू-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०३, तंत्र शिक्षण**<br>**रूपये:- २४,६६,००,६०,०००/-**<br>**श्री. चेतन तुपे** |
| (८) | ५०६९ | १०० | राज्यातील वाढत्या बेरोजगारीला आळा घालण्यासाठी युवकांना स्वयंरोजगाराधिष्टीत शिक्षण/प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या मुख्यालयी शासकीय तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याची आवश्यकता शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष. |
| | | | **मागणी क्रमांक: डब्ल्यू-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०५, कला व संस्कृती**<br>**रूपये:- ४,३२,१६,१५,०००/-**<br>**श्री. चेतन तुपे** |
| (९) | ५०६४ | १० | राज्यभरातील सार्वजनिक वाचनालयांना शासनाकडून दिल्या जात असलेले तुटपुंजे अनुदान,त्यामुळे वाचनालये सक्षमपणे कार्यान्वित ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांची होत असलेली ओढाताण,आर्थिक कुचंबणा,वाचनालयांच्या अनुदानात भरीव वाढ करण्याची दीर्घकालीन मागणी पूर्ण करण्याची आवश्यकता,शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ५०६५ | १० | राज्यभरातील शासकीय ग्रंथालयांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याची दीर्घकालीन प्रलंबित मागणी मान्य करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ५०६८ | १०० | राज्यातील नागरिकांमध्ये वाचनाची आवड वाढीस लावण्यासाठी "गाव तेथे ग्रंथालय" अशा स्वरूपाची अभिनव योजना आखून तिची प्रभावी अंमलबजावणी प्राधान्याने करण्याची आवश्यकता,शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १५ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई